# शासकीय  अभियांत्रिकी महाविद्यालय जळगांव

राष्ट्रीय महामार्ग क्र. ६, जळगांव - ४२५ ००१.

✆ ०२५७-२२८१५२२ (कार्या.) २२८१३१९ (फॅक्स)

Web : www.gcoej.ac.in Email : princoej@rediffmail.com

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगांव येथील मुलांचे व मुलींचे वसतिगृहातील खानावळ चालविण्याचे कंत्राट देण्या करिता दरपत्रके दि. ०३/०७/२०१७ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत मागविण्यात येत आहेत. यासंबंधीचे विस्तृत माहिती, अटी व शर्ती या महाविद्यालयाचे संकेतस्थळ www.gcoej.ac.in व सुचनाफलक यावर उपलब्ध आहे. इच्छुकांनी महाविद्यालयाच्या कार्यालयात प्रत्यक्ष भेटून किंवा संकेतस्थळावरून माहिती घेउन विहित मुदतीत सिलबंद निविदा कार्यालयात सादर करावी. उशिरा आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

प्राचार्य

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगांव

✆ ०२५७-२२८१५२२ (कार्या.) २२८१३१९ (फॅक्स)

Web : www.gcoej.ac.in Email : princoej@rediffmail.com

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगांव, या संस्थेतील मुलांच्या व मुलींच्या वसतिगृहातील खानावळ कंत्राटी तत्वावर देण्या बाबतच्या अटी व शर्ती व इतर आवश्यक माहिती :-

## अटी व शर्ती

१) या महाविद्यालयातील मुलींचे एक व मुलांच्या दोन वसतिगृहात राहणा-या विद्यार्थ्यांच्या खानावळीसाठी (मेस) कंत्राटी तत्वावर प्रति व्यक्ती प्रति माह दराचे वेगवेगळे दरपत्रक सादर करावे. कंत्राटदारास मुलांच्या वसतिगृहात साधारणत: ३६० मुलांकरिता (प्रति वसतिगृह १८०) व मुलींच्या वसतिगृहात साधारणत: १०५ मुलींकरिता खानावळ चालवावी लागेल. (संख्या कमी-जास्त होउ शकते)

२) सदर कंत्राट हे हिवाळी व उन्हाळी सुटी वगळून एक वर्षा करिता असुन सदर कंत्राट पुढील वर्षी चालू ठेवणे वा बंद करणे यासंबंधीचे सर्व अधिकार महाविद्यालयाकडे असतील. तथापि काही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास अथवा खानावळीचा दर्जा / गुणवत्ता समाधानकारक नसल्यास सदर कंत्राट एक महिन्याच्या पूर्वसूचनेने संपुष्टात येईल व त्यास कंत्राटदार जबाबदार राहील.

३) एका कंत्राटदारास मुलींच्या किंवा मुलांच्या वसतिगृहातील खानाावळीचे एक किंवा दोन्ही कंत्राट देण्याचा अधिकार महाविद्यालयाने राखुन ठेवला आहे.

४) विद्यार्थी / विद्यार्थीनींना दोन वेळचे जेवण खालील प्रमाणे द्यावे लागेल.

अ) वरण, भात, दोन भाज्या (साधारणत: एक हिरवी भाजी) व एक सुकी भाजी, गव्हाची पोळी, कांदा किंवा मुळा, काकडी किंवा टमाटे किंवा गाजर व लिंबू तसेच चटणी किंवा लोणचे. (अमर्यादीत)

ब) दर आठवडयातून एकदा सकाळच्या जेवणात मिष्टान्न भोजन (किमान एक गोड व एक नमकीन पदार्थासह - फिस्ट) द्यावी लागेल. त्याच दिवशी संध्याकाळी साधे हलके जेवण (साबूदाणा/दाळ तांदूळ खिचडी, कढी/आमटी इ.) देण्यात यावे.

क) खानावळीत वापरण्यात येणा-या गव्हू , तांदूळ, दाळ, तेल इ. चांगल्या दर्जाचे वापरणे बंधनकारक राहील. (पान क्र. ५ वरील तक्त्यानुसार)

ड) अन्नपदार्थांच्या व खानावळीमधील (मेस) स्वच्छतेचा दर्जा / गुणवत्ते बाबत वसतिगृहातील विद्यार्थी परिषदेची दर महा किंवा गरजेप्रमाणे बैठक घेण्यात येईल. त्यांनी केलेल्या सुचनांचे मेस प्रभारी अधिकारी (उपकुलमंत्री) / कुलमंत्री / प्राचार्य, यांनी खातरजमा केल्यानंतर कंत्राटदारास आवश्यक सुधारणा करणे बाबत कळविण्यात येईल. समाधानकारक सुधारणा न आढळल्यास कंत्राट बंद करणे वा आवश्यक ती दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार सर्वस्वी महाविद्यालयास असतील.

इ) कंत्राटदाराने दर महिन्यास महिन्याभराचा मेनू वसतिगृहातील विद्यार्थी परिषदेकडून ठरवून घेणे बंधनकारक राहील.

फ) एखादा विद्यार्थी आजारी असल्यास त्याच्या आवश्यकतेनुसार जेवण तयार करून देण्यात यावे.

ग) खानावळीत जेवण तयार करतांना व वाढतांना कंत्राटदार अथवा प्रतिनिधी उपस्थित असणे बंधनकारक राहील.

५) विद्यार्थ्याने सलग किमान तीन दिवस किंवा त्यापेक्षा जास्त गैरहजरीची लेखी पूर्वसूचना दिलेली असल्यास त्याची अनुपस्थिती (खाडा) धरण्यात यावी. एका महिन्यात कमाल १५ दिवसाची अनुपस्थिती (खाडा) धरण्यात यावी. व त्याप्रमाणात मासिक देयकाची रक्कम कमी करण्यात यावी. अनुपस्थितीचा हिशोब त्याच महिन्यात करण्यात यावा.

६) कोणत्याही परिस्थितीत कंत्राटदारास एक वर्षभर खानावळीचे दर बदलता येणार नाहीत. तसेच महाविद्यालयाच्या पूर्वपरवानगी शिवाय मध्येच खानावळ बंद करता येणार नाही.

७) खानावळीचे कंत्राट मिळाल्या नंतर सुरूवातीचे पंधरा दिवस कंत्राटदारास महाविद्यालयाकडून कुठलीही अग्रीम रक्कम मिळणार नाही. पहिल्या पंधरा दिवसानंतर ठरलेल्या दरानुसार महिन्याची ५० टक्के रक्कम देण्यात येईल व महिन्या अखेरीस देयक सादर केल्यानंतर एका आठवडयाच्या आत उर्वरीत रक्कम देण्यात येईल. प्रत्येक महिन्याच्या जेवणाचे देयक तयार करून विद्यार्थ्यांच्या माहिती करिता सुचना फलकावर लावण्यात यावे व विद्यार्थ्यांच्या शंकेचे निरसन करून पुढील महिन्याच्या ५ तारखेपूर्वी खानावळ प्रभारी अधिकारी / उपकुलमंत्री यांचेकडे सादर करावे.

८) सदर खानावळ महाविद्यालयाच्या वसतिगृहात असुन महाविद्यालयाच्याच विद्यार्थी/विद्यार्थीनींसाठी असल्याने कंत्राटदारास नाममात्र भाडे रू. ४,०००/- प्रति माह प्रति खानावळ या दराने उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच वापरलेल्या विजेची रक्कम विहीत दराप्रमाणे कंत्राटदारास भरावी लागेल.

९) महाविद्यालयात अनामत रक्कम रू. ५०,०००/- प्रति वसतिगृह प्रति खानावळ (मेस) कंत्राटदारास जमा करावी लागेल. याबद्दल महाविद्यालयात उपलब्ध असलेली खानावळीची भांडी, गॅस कनेक्शन (शेगडी, रिक्त हंडया, गॅस कार्ड ), उपलब्ध फर्निचर कंत्राटदारास वापरण्यास देण्यात येईल.

१०) उपरोक्त साहित्या शिवाय इतर आवश्यक साहित्य कंत्राटदारास स्वखर्चाने आणावे लागेल. व महाविद्यालयाकडून प्राप्त साहित्य व स्वत: आणलेले साहित्य याची रितसर उपकुलमंत्री यांचेकडे नोंद करावी लागेल, जेणेकरून कंत्राटदारास त्याचे स्वत:चे साहित्य कंत्राट संपल्यानंतर परत घेउन जाण्यास अडचण येणार नाही.

११) कंत्राट सुरू असतांना महाविद्यालयाच्या वसतिगृहामध्ये नियमितपणे पंपाव्दारे पाणी चढवण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१२) खानावळीत बालकामगाराची नियुक्ती करता येणार नाही. कंत्राटदाराने शासनाचे कामगार विषयक सर्व कायदे व अधिनियम पाळणे बंधनकारक राहील. तसेच खानावळीत नियुक्त करण्यात येणारे कर्मचारी प्रामाणिक, विश्वासू, शारीरिक दृष्टया सक्षम व अनुभवी असल्याची तसेच त्यांचे विरूध्द कोणत्याची स्वरूपाच्या गुन्हयाची नोंद पोलीस स्टेशनला नाही अशी खात्री कंत्राटदाराने करूनच अशाच कर्मचा-यांची नेमणूक करणे आवश्यक राहील. सर्व कामगारांची माहिती रंगीत छायाचित्रासह संस्थेत जमा करावी लागेल. तसेच त्यांचे फोटो असलेले ओळखपत्राच्या सत्यप्रती जमा कराव्या लागतील. नेमणूक करण्यात आलेल्या खानावळीतील कामगारांनी मद्यपान न करणे, नशा न करणे व गैरवर्तणूक न करणे याकरिता बांधिल राहतील, अशा प्रकारचे गैरवर्तन आढळल्यास अशा कामगारांना दंड ठोठावून त्यांच्या सेवा तात्काळ बंद करण्यात येतील. नियुक्ती कामगारांच्या व्यतिरिक्त इतर कोणासही खानावळीत थांबता येणार नाही.

१३) मुलींच्या वसतिगृहातील सर्व कामगार महिला असणे सक्तीचे राहील.

१४) सदर कंत्राटा दरम्यान कंत्राटदाराच्या खानावळीतील कर्मचारी/कामगारास काम करीत असतांना त्यांच्या जिवितास काही हानी / इजा / दुखापत / नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. संस्था कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. कंत्राटदाराच्या कर्मचारी/ कामगारांच्या निष्काळजीपणामुळे खानावळीतील वस्तु तथा साहित्याचे नुकसान झाल्यास किंवा चोरी झाल्यास त्याची भरपाई देण्याची संपूर्ण जबाबदारी ही कंत्राटदाराची राहील.

१५) सदरच्या कंत्राट कालावधीमध्ये, कंत्राट पध्दतीवरील नेमणूकी बाबत शासनाची काही वेगळी धोरणे / निर्णय ठरल्यास आवश्यक असल्यास कंत्राट कालावधी संपण्यापूर्वी संपुष्टात आणण्याचे अधिकार या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना राहतील.

१६) खानावळीत आरोग्यदायक स्वच्छता ठेवण्याची व खानावळीत सर्व कामगारांच्या नियमित वैद्यकीय तपासणी करण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१७) कंत्राटदारास खानावळीत तक्रारनोंदवही ठेवणे बंधनकारक राहील. खानावळीत जेवण्यास येणा-या बाहेरील विद्यार्थी / विद्यार्थीनी / अतिर्थीचे (गेस्ट चार्ज) प्रति जेवण दर महाविद्यालयाच्या संमतीने ठरविण्यात येतील. तसेच विद्यार्थ्यांना चहा / नाश्ता देण्याची परवानगी व त्याचे दर सुध्दा महाविद्यालयाच्या संमतीनेच ठरविण्यात येतील.

१८) कंत्राटदार अटी व शर्ती नुसार कंत्राट चालविण्यास असमर्थ ठरल्यास त्यास दंडासह त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१९) खानावळ चालवित असतांना कंत्राटदारास बंधनकारक असलेल्या बाबींचे उल्लंघन झाल्यास खालील प्रमाणे दंड आकरण्यात येईल.

| अ.क्र. | बाबींचा तपशिल | आकारण्यात येणा-या दंडाची रक्कम |
|---|---|---|
| १) | तक्रार नोंदवही न ठेवणे | रू. १००/- प्रति दिवस |
| २) | जेवणात कुठलाही किटक आढळणे | रू. ५००/- प्रति घटना |
| ३) | जेवणात प्लॅस्टीक / दोरी / कपडा आढळणे | रू. ५००/- प्रति घटना |
| ४) | जेवणात दगड/खडे २ मिमी पेक्षा मोठे आढळणे | रू. २००/- प्रति घटना |
| ५ | अस्वच्छ भांडी / मेस परिसर | रू. ५००/-प्रति दिवस |
| ६) | कच्चे / न शिजवलेले/ बेचव अन्न आढळणे | रू. १०००/- प्रति दिवस |
| ७) | जेवण विहीत वेळेत न देणे किंवा वेळ संपण्यापूर्वी मेस बंद करणे | रू. ५००/- प्रति दिवस |
| ८) | वसतिगृह विद्यार्थी परिषदेच्या परवानगी शिवाय मेनू बदल करणे | रू. ५००/- प्रति दिवस |
| ९) | कामगारांची अस्वच्छता व असभ्य वर्तन | रू. २००/- प्रति कामगार |

उपरोक्त बाबीं शिवाय खानावळीचा दर्जा विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने अपायकारक आढळल्यास वसतिगृह विद्यार्थी परिषद त्याची तपासणी करून उपकुलमंत्री, कुलमंत्री, प्राचार्य त्याची शहानिशा करून कंत्राटदारावर उचित दंडात्मक कारवाई करतील. वरील बाबींचे उल्लंघन दुस-यांदा, तिस-यांदा इ. वेळा झाल्यास दंडाची रक्कम दुप्पट, तिप्पट याप्रमाणे

वाढत जाईल व वारंवार सदर बाबी निदर्शनास येत असल्यास सदर कंत्राट तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल.

२०) उपरोक्त अटी व शर्ती संबंधी काही वाद निर्माण झाल्यास त्यासंबंधी महाविद्यालय प्रशासनाचा निर्णय अंतिम व कंत्राटदारास बंधनकारक राहील. तसेच उपरोक्त अटी व शर्तीमध्ये बदल / सुधारणा करण्याचा पुर्ण हक्क महाविद्यालय प्रशासनाने राखून ठेवला आहे.

२१) खानावळीत खालील प्रमाणे दर्जा (ब्रॅन्ड) असणारे विविध प्रकारचे धान्य / पदार्थ वापरण्यात यावेत.

| अ.क्र. | पदार्थाचा तपशिल | पदार्थाचा दर्जा (ब्रॅन्ड) |
|---|---|---|
| १ | गव्हू | १४७, शरबती किंवा तत्सम प्रतीचे |
| २ | तांदूळ | कोलम , एचएमटी, इंद्रायणी किंवा तत्सम प्रतीचे |
| ३ | खाद्यतेल (रिफाइनड) | सनफलॉवर / सोयाबीन किंवा तत्सम प्रतीचे |
| ४ | मीठ | टाटा, शुध्द, अन्नपुर्णा किंवा तत्सम प्रतीचे |
| ५ | सर्व प्रकारच्या दाळी | चांगल्या प्रतीच्या |
| ६ | मसाले | एमडीएच, एव्हरेस्ट, सुहाना किंवा तत्सम प्रतीचे |

**टीप : वरील तक्त्यात नमुद केलेल्या ज्या वस्तू / पदार्थांचा दर्जा (ब्रॅंड) नमुद केलेला नाही ते पदार्थ महाविद्यालय प्रशासनाच्या संमतीने ठरवून वापरावे.**

## इतर आवश्यक माहिती

१) कंत्राटी पध्दतीने खानावळ चालविण्या संबंधीच्या सर्व अटी व शर्ती मान्य असतील तरच कंत्राटदाराने निविदा भरावी. स्विकृत झाल्यास कंत्राटदारांना वरील प्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्या बाबतचा करारनामा रू. १००/- (अक्षरी - रू. शंभर फक्त) च्या स्टॅम्प पेपरवर नोटरीसमोर करून द्यावा लागेल. त्यानंतरच प्राचार्यांकडून खानावळीचे कंत्राट देण्या बाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

२) सदर कंत्राटी संबंधीच्या निविदा महाविद्यालयात रू. १०००/- भरून उपलब्ध होतील किंवा महाविद्यालयाच्या संकेतस्थळावरून डाउनलोड करून भरल्यास रू. १०००/- इतक्या रक्कमेचा धनाकर्ष प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगांव यांच्या नावाने व जळगांव येथे देय असलेला काढून निविदे सोबत जोडावा.

३) सदर कंत्राटा संबंधीच्या निविदा दोन स्वतंत्र लिफाफयात दि. ०३/०७/२०१७ दुपारी ०३.०० वाजेंपर्यंत मागविण्यात येत आहे. विहीत मुदतीच्या नंतर प्राप्त निविदा ग्राहय धरल्या जाणार नाहीत.

लिफाफा क्र. १ Part A – कंत्राटदाराची माहिती व संबंधित प्रमाणपत्रांचा लिफाफा.

लिफाफा क्र. २ Part B – दरपत्रक प्रति विद्यार्थी प्रति महिना (सर्व करांसहीत) मुलींच्या व मुलांच्या वसतिगृहातील खानावळीसाठी दोन वेगवेगळया लिफाफयात सादर करावा.

४) मुलींच्या वसतिगृहातील खानावळी करिता प्रति जेवण प्रति महिना व मुलांच्या वसतिगृहातील खानावळी करिता प्रति जेवण प्रति महिना लागणारा **अपेक्षित आधारभूत दर** महाविद्यालयाच्या प्रशासनाने ठरविलेला असुन, तो गोपनीय राहील. त्या दराच्या तुलनेत निविदेतील नमुद दर ५ टक्क्यांपेक्षा कमी असल्यास अशा निविदा अपात्र ठरविण्यात येतील.

५) मोहोरबंद लिफाफयावर ''मुलींच्या वसतिगृहातील खानावळीसाठी निविदा'' किंवा ''मुलांच्या वसतिगृहातील खानावळीसाठी निविदा'' असा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक राहील.

६) सदर निविदा दि. ०३/०७/२०१७ रोजी सायंकाळी ०५.०० वा. फक्त लिफाफा Part A उघडण्यात येईल व सदर कागदपत्रांची पुर्तता करणा-या कंत्राटदारासच पुढील प्रक्रियेस (Part B) पात्र ठरविण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

७) खानावळीचे कंत्राट देण्यापूर्वी / निविदा पात्र करण्यापूर्वी Part A मधील कागदपत्रांची पुर्तता, पुर्वानुभव, कामाचा दर्जा व नमुद दर या व्यतिरिक्त आवश्यकता असल्यास त्यांना पूर्व पात्रतेच्या सादरीकरणास बोलविण्यात येईल.

८) प्राप्त झालेल्या सर्व निविदा कोणतेही कारण नमुद न करता नाकारण्याचा तसेच सदर निविदा प्रक्रिया कधीही कोणत्याही कारणा शिवाय / पुर्वसुचनेशिवाय स्थगित करण्याचे पुर्ण अधिकार महाविद्यालय राखून ठेवत आहे. या सर्व प्रक्रिये दरम्यान प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगांव यांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक राहील.

९) यापूर्वी या महाविद्यालयाच्या वसतिगृहातील खानावळीचे कंत्राट महाविद्यालयाने कारवाई करून कंत्राट बंद करण्यात आलेले कंत्राटदार सदर निविदा भरण्यास पात्र राहणार नाहीत.

# **Part A**

कंत्राटदारांनी निविदा भरतांना खालील नमुन्यात आवश्यक ती माहिती भरून त्यासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती सोबत जोडाव्यात.

**माहितीचा नमुना :**

| अ.क्र. | कंत्राटदाराचा तपशिल | |
|---|---|---|
| १ | कंत्राटदाराचे संपूर्ण नाव | |
| २ | संपुर्ण पत्ता पिनकोडसह | |
| ३ | दुरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ४ | अनुभवाचा तपशिल (मागील दोन वर्षाचा कंत्राटाचा तपशिल) | |
| ५ | यापूर्वी कंत्राट रद्द झाला असल्यास त्याची कारणे | |
| ६ | सद्यस्थितीत दुस-या इतर ठिकाणी खानावळीचे कंत्राट सुरु असल्यास त्याचा संदर्भ व तपशिल द्यावा | |
| ७ | मागील दोन वर्षाचा आर्थिक उलाढाली संबंधीचा तपशिल | |
| ८ | धनाकर्षाचा तपशिल | |
| ९ | अ) दुकान अधिनियम परवाना नोंदणी क्रमांक व दिनांक<br>ब) अन्न व सुरक्षा विभागाचा परवाना | |
| १० | PAN card / CST / VAT / Aadhar Card/ EPIC - क्रमांक | |

मी ________________________ असे घोषित करतो की, निविदेत नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य असुन त्यानुसार खानावळीचे कंत्राट घेण्यास मी इच्छूक आहे.

दिनांक-
स्थळ-

कंत्राटदाराचे नाव व सही

**<u>सोबत जोडावायाची आवश्यक कागदपत्रे :</u>**

कंत्राटदाराने खालील कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती निविदा सोबत जोडाव्यात. तसेच निविदा सादर करतांना सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रत्येक पानावर कंत्राटदाराची सही व शिक्का असणे आवश्यक आहे.

१) दुकान अधिनियम परवाना नोंदणी प्रमाणपत्र.

२) अन्न व सुरक्षा विभागाचा परवाना.

३) किमान २ वर्ष २०० मुलांसाठीची किंवा मुलींच्या वसतिगृहातील खानावळीसाठी किमान १०० मुलींसाठीची किंवा अधिक क्षमतेची यापूर्वी शासकीय, निमशासकीय अथवा खाजगी अशा मोठया संस्थांमध्ये खानावळ चालविण्याचा अनुभव असल्याचे सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र.

४) वार्षिक आर्थिक उलाढाला किमान ५ लाख असल्याचे मागील २ वर्षाचे बॅक पासबुकची साक्षांकीत केलेले छायांकीत प्रत (रेकॉर्ड)

५) PAN card / CST / VAT / Aadhar Card/ EPIC

६) याव्यतिरिक्त सक्षम अधिका-यांकडून प्राप्त केलेले इतर आवश्यक प्रमाणपत्रे.

## <u>Part B</u>

दरपत्रक प्रति विद्यार्थी प्रति महिना (सर्व करांसहीत) मुलींच्या व मुलांच्या वसतिगृहातील खानावळीसाठी **दोन वेगवेगळया लिफाफयात** सादर करावा.

### <u>दरपत्रक</u>

| अ.क्र. | तपशिल | दर प्रति विद्यार्थी/विद्यार्थीनी प्रति महिना ( रूपयात ) |
|---|---|---|
| १ | अटी व शर्तीचे पान नं. १ वरील मुद्दा क्र. ४ नुसार खानावळ चालविणे | |

वरील दर सर्व करांसहीत असुन, ते पुढील सहा महिन्या करिता वैध राहतील.

मी ______________________________ असे घोषित करतो की, निविदेत नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य असुन त्यानुसार वरील दराप्रमाणे खानावळीचे कंत्राट घेण्यास मी इच्छूक आहे.

दिनांक-
स्थळ-

कंत्राटदाराचे नाव व सही